| MHAH140015642020 | दाखल दिनांक | : | ०४/१२/२०२० |
|---|---|---|---|
| | नोंदणी दिनांक | : | ०५/१२/२०२० |
| | निकाल दिनांक | : | ०९/०३/२०२६ |
| | कालावधी | : | वर्षे महिने दिवस |
| | | : | ०५ ०३ ०५ |

**नेवासा येथील दुसरे सह दिवाणी न्यायाधीश क.स्तर, नेवासा यांचे न्यायालयात**

**(पिठासीन अधिकारी श्रीमती संध्या यु. सुळ)**

**दिवाणी किरकोळ अर्ज क्र.६६/२०२०**

**निशाणी –६०**

**१. सखाराम मुक्ताजी आरगडे,(मयत)** )

**१अ. भागवत सखाराम आरगडे,** )
वय – ६० वर्षे, धंदा – शेती, )
**१ब. रावसाहेब सखाराम आरगडे,** )
वय – ४७ वर्षे, धंदा – शेती, )
**१क. आबासाहेब सखाराम आरगडे,** )
वय – ५२ वर्षे, धंदा – शेती, )
अर्जदार १अ ते १क रा. सौंदाळा, )
ता. नेवासा, जि. अहिल्यानगर. )
**१ड. लताबाई रावसाहेब नाबदे,** )
वय – ४४ वर्षे, धंदा – घरकाम, )
रा. शिरसगाव, ता. नेवासा, जि. अहिल्यानगर. )
**१इ. जनाबाई निवृत्ती आरगडे,** )
वय – ५० वर्षे, धंदा – शेती, )
रा. सौंदाळा, ता. नेवासा, जि. अहिल्यानगर. )
**१ई. निर्मला चंद्रभान ढेपे,** )
वय – ३७ वर्षे, धंदा – घरकाम, )
रा. निंभेरे, ता. राहूरी, जि. अहिल्यानगर. )

**१उ. प्रदिप निवृत्ती आरगडे,** )
वय – २७ वर्षे, धंदा – शेती, )
**१ऊ. आसराबाई सखाराम आरगडे,** )
वय – ८४ वर्षे, धंदा – शेती, )
अर्जदार क्र. १उ व १ऊ रा. सौंदाळा, )
ता. नेवासा, जि.अहमदनगर, ) **...अर्जदार**

<u>विरुध्द</u>

**१. धोंडाबाई बन्सी आरगडे,(मयत)** )
**१अ. लक्ष्मण बन्सी आरगडे,** )
वय – ६० वर्षे, धंदा– शेती, )
**१ब. हनुमंत बन्सी आरगडे,** )
वय – ५८ वर्षे, धंदा– शेती, )
**१क. मिरा भाऊसाहेब ठूबे,** )
वय – ५५ वर्षे, धंदा– घरकाम, )
सामनेवाला क्र. १अ ते १क रा. सौंदाळा, )
ता. नेवासा, जि. अहिल्यानगर. )
**१ड. अलका दत्तात्रय दिघे,** )
वय – ५० वर्षे, धंदा– घरकाम, )
रा. गणपती आव्हाणे, ता. शेवगाव, )
जि. अहिल्यानगर. )
**१इ. अनिता संजय कचरे,** )
वय – ४० वर्षे, धंदा– शेती, )
रा.कुकाणा, ता. नेवासा, जि. अहिल्यानगर. )
**२. एकनाथ राधाजी आरगडे,** )
वय – ६० वर्षे, धंदा– शेती, )
**३. मच्छिंद्र राधाजी आरगडे,** )
वय – ५० वर्षे, धंदा– शेती, )
**४. अशोक राधाजी आरगडे,** )
वय – ४५ वर्षे, धंदा– शेती, )

| | | |
|---|---|---|
| ५. **बबनबाई आण्णासाहेब कार्ले,** | ) | |
| वय – ५७ वर्षे, धंदा– शेती, | ) | |
| ६. **छबनबाई दत्तात्रय काळे,** | ) | |
| वय – ५५ वर्षे, धंदा– शेती, | ) | |
| ७. **मंदाबाई अंबादास गमे,** | ) | |
| वय – ३२ वर्षे, धंदा– शेती, | ) | |
| सामनेवाले क्र. २ ते ७ रा. सौंदाळा, | ) | |
| ता. नेवासा, जि. अहिल्यानगर. | ) | |
| ८. **कलाबाई राधाजी आरगडे,(मयत)** | ) | **...सामनेवाले** |

---

**अर्ज – दरखास्त पुन्हा फैलावर घेण्याकरीता झालेला उशिर माफ होवून मिळणेकरीता.**

---

अर्जदारांतर्फे विधिज्ञ –श्री.जी.आर.नजन,एस. एम. घोडेचोर
सामनेवाले क्र. १अ ते १इ तर्फे विधीज्ञ – श्री. जी. एम. निकम.
सामनेवाले क्र. ३ तर्फे विधीज्ञ – श्री. टी. के. शिंदे.
सामनेवाले क्र. २,४ ते ७ विरुध्द एकतर्फा.

---

## न्यायनिर्णय
## ( दिनांक ०९/०३/२०२६ रोजी घोषित )

अर्जदारांनी प्रस्तुत अर्ज हा नियमिद दरखास्त क्र. १९/२०१० ही पुन्हा फैलावर घेण्याकरीता अर्ज दाखल करण्यास झालेला उशिर माफ होवून मिळणेकरीता दाखल केला आहे.

**अर्जदारांचे कथन थोडक्यात पुढीलप्रमाणे–**

२. अर्जदारांनी असे कथन केले आहे की, अर्जदार यांचे वडील मयत सखाराम मुक्ताजी अरगडे यांनी सामनेवाला यांच्याविरुद्ध रे.मु.नंबर ५८/२००६ हा दावा दाखल केला होता. सदर दाव्याचा निकाल होऊन मिळकतीची दि.०९/०४/२००७ रोजी मो.र.नंबर

२३४/२००७ अन्वये मोजणी झालेली आहे. सदर मोजणीच्या हद्दी कायम करण्याचे बाकी राहिलेले होते. त्याकरिता दरखास्त क्रमांक १९/२०१० यामध्ये दि. ०६/०६/२०१२ रोजी वादी व प्रतिवादी यांना उपाधीक्षक भूमी अभिलेख नेवासा यांच्यामार्फत नोटीसा बजावण्यात आल्या होत्या. परंतु, सदर दरखास्तमध्ये अर्जदार यांचे वडील सतत आजारी असल्याकारणाने तारखेस हजर राहू शकले नाहीत. त्यामुळे सदरची दरखास्त दि. १९/०१/२०१९ रोजी धनको गैरहजर असल्याने निकाली काढण्यात आली.

३. अर्जदाराचे वडील दि.०७/१०/२०१३ रोजी मयत झाले. त्यानंतर अर्जदार यांना सदर दरखास्तची माहिती मिळाली. अर्जदार यांना सदर दरखास्तची कोणतीही नोटीस मिळालेली नव्हती. तसेच त्यांचे विधीज्ञ यांच्याकडून देखील त्यांना दरखास्तीबद्दल कळविण्यात आले नव्हते. अर्जदार यांना दि.०९/१०/२०२० रोजी दरखास्त खारीज केल्याची माहिती मिळाली. त्यानंतर तीस दिवसांच्या आत मुदतीमध्ये दरखास्त पुन्हा फैलावर घेण्याकरिता अर्ज दाखल करणे आवश्यक होते. परंतु, त्यास १ वर्ष १० महिने २० दिवस इतका उशीर झालेला आहे. अर्जदार यांना दि.०९/१०/२०२० रोजी दरखास्ततीच्या निकालाची माहिती मिळाली, त्यानंतर दाव्याची नक्कल घ्यावी लागली. सदरची नक्कल दि.१०/११/२०२० रोजी मिळाली. त्यामुळे नक्कल तारखेच्या पासून ३० दिवस धरले तर अर्ज मुदतीत आहे.

४. दरखास्त क्रमांक १९/२०१० ही पुन्हा फैलावर घेऊन गुणदोषावर चौकशी होऊन अर्जदारांना त्यांचे म्हणणे मांडण्याची संधी देणे आवश्यक आहे. तसे न झाल्यास अर्जदारांचे अपरिमित नुकसान होईल. अर्जदार यांना कायदेशीर माहिती नव्हती. तसेच विधीज्ञ यांच्याशी संपर्क झाला नाही. त्यामुळे सदरची दरखास्त खारीज झालेली आहे. ती दरखास्त पुन्हा फैलावर

घेतल्यास सामनेवाला यांचे कोणतेही नुकसान होणार नाही. सबब, दरखास्त क्रमांक १९/२०१० ही पुन्हा फैलावर घेण्यासाठी झालेला उशीर माफ करण्यात यावा.

**५.** सामनेवाले क्र. २,४ ते ७ यांना समन्स बजावणी होवून देखील ते प्रस्तुत अर्जाच्या कामी हजर न झाल्याने प्रस्तुत अर्ज सामनेवाले क्र. २,४ ते ७ यांच्याविरुध्द एकतर्फा चालविण्यात येत आहे. सामनेवाला क्र. ३ याने निशाणी क्र. १२ वर पुरसीस दाखल करून प्रस्तुत अर्ज मान्य केला आहे.

**६.** सामनेवाला क्रमांक १अ ते १इ यांनी निशाणी क्रमांक ४४ वर प्रस्तुत अर्जास म्हणणे दाखल केले आहे. त्यांनी कथन केले आहे की, प्रस्तुत अर्जातील नमूद कारण खोटे आहे. मूळ दावा रे.मु. नंबर ५८/२००६ हा सखाराम मुक्ताजी अरगडे यांनी प्रतिवादी धोंडाबाई बन्सी अरगडे व इतर यांच्याविरुद्ध मनाई हुकमासाठी दाखल केला होता. सदर दाव्यामध्ये मोजणी रजिस्टर क्रमांक २३४/२००७ प्रमाणे भूमी अभिलेख नेवासा यांनी दि. ०९/०४/२००७ रोजी मोजणी करू नकाशा दाखल केला होता. त्यानंतर सदर मोजणी प्रमाणे सखाराम अरगडे यांनी दरखास्त क्रमांक १९/२०१० दाखल केली होती. त्यामध्ये त्यांनी दि. ०६/०६/२०१२ रोजी हद्दी खुणा कायम करण्यासाठी अर्ज दिला होता. त्याचे काम न्यायप्रविष्ठ होते. दरम्यान दिनांक १९/०१/२०१९ रोजी सखाराम आरगडे हे हजर न राहिल्याने सदरची दरखास्त खारीज करण्यात आली होती. त्यामुळे प्रस्तुत अर्ज दाखल केला आहे. परंतु उशीर माफीचा अर्ज दाखल करण्यास सुमारे एक वर्ष दहा महिने वीस दिवस इतका उशीर झालेला आहे. कायद्याप्रमाणे ३० दिवसांच्या आत सदरचा अर्ज देणे कायदेशीर होते. तसेच, प्रत्येक दिवसाच्या उशिराचे कारण अर्जदाराने अर्जात नमूद केलेले नाही. केवळ अर्जदारांचे वडील आजारी होते त्यामुळे हजर राहू शकले नाहीत, कोर्टाने अर्जदारांना नोटीस काढलेली आहे, दरखास्तची माहिती मिळाली नाही

असे मोघम कारण दिलेले आहे. वास्तविक मूळ दावा अर्जदार यांच्या वडिलांनी दाखल केला होता. त्यांना दावा व दरखास्तबाबत संपूर्ण माहिती होती. दि. ०९/१०/२०२० रोजी दरखास्त खारिज झाल्याचे अर्जदारांच्या निदर्शनास आले हे देखील मोघमपणे नमूद केलेले आहे. त्यामुळे सदरचा अर्ज बेकायदेशीर असल्याने रद्द करण्यात यावा.

७. सामनेवाला यांनी पुढे असं केले आहे की, मूळ दाव्यामध्ये सन २००७ मध्ये मोजणी झालेली आहे. त्यानंतर सदर गट नंबर मध्ये अनेक बदल होऊन हिस्से पडलेले आहेत. सदर गट नंबर मधून जो नेवासा ते शेवगाव हमरस्ता गेलेला आहे त्याचे क्षेत्र वाढलेले आहे. त्यामुळे सन २००७ च्या मोजणीच्या नकाशा प्रमाणे कुठलेही क्षेत्र अस्तित्वात नाही. सन २००७ च्या मोजणीनंतर सदर गट नंबर १९१,१९२ व ३ यामध्ये घरांचे बांधकाम झालेले आहेत. ही बाब अर्जदार यांनी लपवून ठेवलेली आहे. तसेच सदरच्या हद्दीच्या खुणा करतेवेळी वादी व प्रतिवादी हजर नसल्यामुळे त्यावेळी झालेल्या खुणा व नकाशा ग्राह्य धरता येणार नाही. तसेच सदर नकाशाप्रमाणे आजरोजी वस्तुस्थिती नाही. कायद्याप्रमाणे अतिक्रमण क्षेत्राचा कब्जा बारा वर्षाच्या आत मागणे जरुरीचे असल्याने अर्जदारांना प्रस्तुत अर्ज दाखल करण्याचा अधिकार नाही. सखाराम अरगडे हे आजारी होते, दवाखान्यात होते याबाबत कुठलाही कागदोपत्री पुरावा अर्जदाराने जोडलेला नाही. तसेच अर्जदार यांना मूळ दावा व दरखास्त याची माहिती मिळाली नाही याबाबत देखील कागदोपत्री पुरावा जोडलेला नाही. अर्जदार यांना सुमारे सात वर्षापेक्षा जास्त उशीर झालेला आहे. उशिराच्या कारणाबाबत कोणताही कागदपत्रे पुरावा दिलेला नाही. सबब, प्रस्तुत अर्ज नामंजूर करण्यात यावा व अर्जदार यांना रक्कम रुपये २०,०००/– दंड आकारण्यात यावा.

८. अर्जाच्या निर्गतीच्या दृष्टीने माझे विचारात खालील मुद्दे उपस्थित झाले. त्यांचे

सकारण निष्कर्ष खालीलप्रमाणे नोंदवित आहे–

| अ.क्र. | मुद्दे | निष्कर्ष |
|---|---|---|
| १. | दरखास्त पुन्हा फैलावर घेण्याकरीता झालेल्या विलंबाचे योगय व संयुक्तीक स्पष्टीकरण देण्यात आले आहे का? | नाही. |
| २. | आदेश काय? | अर्ज नामंजूर करण्यात येतो. |

## कारणमिमांसा

**९.** प्रस्तुत अर्जाच्या पुष्ठ्यर्थ पुरावा देणे नाही अशी पूरशीस अर्जदार यांनी निशाणी क्रमांक ५२ वर दाखल केलेली आहे. तसेच सामनेवाला यांनी निशाणी क्रमांक ५७ वर पुरावा देणे नाही अशी पुरशीस दाखल केलेले आहे.

**१०.** अर्जदारांतर्फे अर्जाच्या पुष्ठ्यर्थ अभिलेखावर खालील कागदपत्रे दाखल करण्यात आली.

| अ.क्र. | कागदपत्रांचे वर्णन |
|---|---|
| १. | मौजे सौंदाळा, ता. नेवासा येथील खाते क्र. २४७ चा ८–अ उतारा (निशाणी क्र. ३४) |
| २. | मौजे सौंदाळा, ता. नेवासा येथील गट क्र. १९२ चा ७/१२ उतारा (निशाणी क्र. ३५) |
| ३. | मयत सखाराम मुक्ताजी आरगडे यांचा मृत्यूचा दाखला (निशाणी क्र. ३६) |
| ४. | रे.मु.नं. ५८/२००६ मधील हुकूमनाम्याची प्रत (निशाणी क्र. ३७) |
| ५. | नियमित दरखास्त क्र. १९/२०१० मधील निशाणी क्र. १ ची प्रत (निशाणी क्र. ३८) |
| ६. | मो.र.नं. २३४/२००७ चा मोजणी नकाशा (निशाणी क्र. ३९) |

**११.** अर्जदार तर्फे मा. विधीज्ञ श्री. जी. आर. नजन यांनी युक्तिवाद केला की अर्जदार यांचे वडील दि.०७/१०/२०१३ रोजी मयत झाले. दावा तसेच दरखास्तीचे संपूर्ण कामकाज हे

अर्जदार यांचे वडीलच पाहत असल्याने अर्जदार यांना त्याबद्दल कोणतीही माहिती नव्हती. वडील मयत झाल्यानंतर दि.०९/१०/२०२० रोजी अर्जदार यांना दरखास्त खारीज केल्याची माहिती मिळाली. त्यापूर्वी अर्जदार यांना त्याबद्दल कोणतीही माहिती नव्हती. त्यानंतर मूळ दाव्याच्या नकला काढण्यामध्ये वेळ गेला. त्यामुळे अर्जदार यांना दरखास्त पुनर्फैलावर घेण्याकरिता अर्ज दाखल करण्यास ०१ वर्ष १० महिने २० दिवस एवढा उशीर झालेला आहे. सदरचा उशीर हा संयुक्तिक कारणामुळे झालेला आहे. तसेच सदरची दरखास्त पुनर्फैलावर न घेतल्यास अर्जदार यांचे अपरिमित नुकसान होईल. याउलट दरखास्त पुनर्फैलावर घेऊन गुणदोषावर चौकशी झाल्यास सामनेवाला यांचे कोणतेही नुकसान होणार नाही. सबब, अर्ज मंजूर करण्यात यावा.

**१२.** सामनेवाला क्रमांक १अ ते १ इ यांचे विधीज्ञ श्री. जी. एम. निकम यांनी युक्तिवाद केला की, दरखास्त क्रमांक १९/२०१० ही दिनांक १९/०१/२०१९ रोजी खारिज केलेली आहे. परंतु, सदर दरखास्त व तिचे कागदपत्र पाहिल्यास त्यामध्ये अर्जदार यांचे वडील म्हणजेच धनको हे सन २०१२ ते २०१९ या कालावधीपर्यंत गैरहजर होते. परंतु, त्या कालावधीमधील गैरहजेरीचे अथवा उशिराचे कोणतेही कारण अर्जदार यांनी अर्जामध्ये दिलेले नाही. तसे पाहिल्यास अर्जदार यांना ७ वर्ष एवढा कालावधीचा उशीर झालेला आहे. अर्जदार यांनी प्रत्येक दिवसाच्या उशिराचे कारण अर्जामध्ये नमूद करणे व त्यावर पुरावा देणे आवश्यक होते. परंतु अर्जदार यांनी प्रत्येक दिवसाच्या उशिराचे कारण नमूद केलेले नाही. तसेच अर्जदार यांनी त्यांचे वडील आजारी असल्याचे कारण दिलेले आहे. परंतु त्या कारणाच्या पुष्ठ्यर्थ कोणताही पुरावा दिलेला नाही. त्यामुळे अर्जदार यांनी झालेल्या उशिराबाबत दिलेले कारण संयुक्तिक नसल्याने सदरचा अर्ज नामंजूर करण्यात यावा.

**मुद्दा क्रमांक १ व २ करिता –**

**१३.** संपूर्ण अभिलेखाचे अवलोकन केले. निशाणी क्रमांक ३६ वर अर्जदार यांचे वडील म्हणजेच सखाराम मुक्ताची आरगडे यांचा मृत्यू दाखला दाखल केला आहे. त्यानुसार सखाराम मुक्ताची आरगडे हे दि.०७/१०/२०१३ रोजी मयत झालेले आहेत असे दिसून येते. अर्जदारांनी निशाणी क्रमांक ३८ वर दरखास्त क्रमांक १९/२०१० याची कागदपत्रे दाखल केलेली आहे. त्यावरून असे दिसते की, सदर दरखास्त मध्ये धनको हे गैरहजर असल्याने दि.०३/०१/२०१८, दि. २३/०२/२०१८ व दि.०६/१२/२०१८ रोजी सदरची दरखास्त खारीज करण्याच्या आदेशाकरिता ठेवण्यात यावी असे आदेश निशाणी क्र. १ वर पारित केलेले आहेत. तसेच दि.१९/०१/२०१९ रोजी सदरची दरखास्त धनको गैरहजर असल्याने दुपार सत्रात खारीज करण्यात येईल असा आदेश पारित केलेला होता व त्याच दिवशी सदरची दरखास्त खारीज करण्यात आली.

१४. त्यानंतर प्रस्तुत अर्ज हा दि.०४/१२/२०२० रोजी दाखल केलेला आहे. म्हणजेच सदरची दरखास्त खारीज केल्यानंतर ०१ वर्ष १० महिने २० दिवस एवढा उशिराने प्रस्तुत अर्ज दाखल केला आहे. त्यास अर्जदार यांनी त्यांना दरखास्त बद्दल कोणतीही माहिती नव्हती, ती माहिती त्यांना दि.०९/१०/२०२० रोजी झाली, त्यानंतर मूळ दाव्याचे कागदपत्र प्राप्त करण्यात वेळ गेला असे कारण नमूद केले आहे. झालेला उशीर हा बराच मोठा आहे. तसेच कायद्यानुसार अर्जदार यांनी झालेल्या उशिराचे प्रत्येक दिवसाचे कारण नमूद करणे व त्याकरिता पुरावा देणे आवश्यक आहे. परंतु प्रस्तुत अर्जामध्ये अर्जदार यांनी प्रत्येक दिवसाच्या उशिराचे कारण नमूद केलेले नाही. तसेच त्यांना दरखास्त खारीज झाल्याची माहिती दि.

०९/१०/२०२० रोजी मिळाली असे नमूद केलेले आहे. परंतु सदरची दरखास्त ही सन २०१० पासून प्रलंबित होती व अर्जदार यांचे वडील दि.०७/१०/२०१३  रोजी मयत झाले. अशा परिस्थितीत अचानक दि. ०९/१०/२०२० रोजी अर्जदार यांना दरखास्त खारीज झाल्याची माहिती कशी काय मिळाली याबद्दल कोणतेही स्पष्टीकरण अर्जदार यांनी दिलेले नाही. त्यामुळे अर्जदार यांना दि. ०९/१०/२०२० रोजी अचानक दरखास्त खारीज झाल्याची माहिती मिळाली व त्यापूर्वी त्यांना दरखास्त बद्दल माहिती नव्हती हे सिद्ध होत नाही. तसेच अर्जदाराने नमूद केलेल्या कारणाच्या पुष्ठ्यर्थ कोणताही तोंडी अथवा कागदोपत्री पुरावा दाखल केलेला नाही. अशा परिस्थितीत अर्जदार यांनी उशिराबाबत अर्जामध्ये नमूद केलेले कारण पुराव्या अभावी योग्य व संयुक्तिक वाटत नाही. सबब, अर्जदार यांना दरखास्त क्रमांक १९/२०१० ही पुन्हा फैलावर घेण्यास झालेला १ वर्ष १० महिने २० दिवस एवढा उशीर माफ करण्यास कोणतेही योगय व संयुक्तिक कारण अभिलेखावर नाही. म्हणून मुद्दा क्रमांक १ चे उत्तर नकारार्थी नोंदवीत असून मुद्दा क्रमांक २ करिता खालील प्रमाणे आदेश पारित करीत आहे.

**आदेश**

अर्ज खर्चासह नामंजुर करण्यात येतो.

(न्यायनिर्णय खुल्या न्यायालयात घोषित.)

स्वाक्षरीत/–

**(संध्या यु. सुळ)**

२ रे सह दिवाणी न्यायाधीश, क.स्तर

नेवासा, जि. अहमदनगर

दिनांक –०९/०३/२०२६.

ठिकाण– नेवासा.